पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८, लेखा विभाग
क्र.लेखा/२९/कावि/९१०/२०२१
दिनांक :- १३ /०७/२०२१

विषय:- सदस्य पारीत ठरावांच्या अंमलबजावणीबाबत.

परिपत्रक,

महानगरपालिकेच्या काही विभागांकडून तरतूद वर्गीकरण मा.स्थायी समिती व मा.महापालिका सभा सदस्य पारीत ठरावानुसार प्रस्तावित केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर सदस्य पारीत ठराव हे विभागांकडून प्रस्तावित होत नसल्याने विभागांना आवशयक असलेल्या कामांमधून इतर विभाग / कामांवर तरतूद वर्गीकरण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधीत विभागांच्या अनुमतीशिवाय केलेल्या वर्गीकरणामुळे आर्थिक वर्षात चालू असलेल्या अथवा नविन प्रस्तावित केलेल्या कामांना तरतूद अपूरी पडण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे झालेल्या वर्गीकरणामुळे अनेक विभागांच्या / नगरसदस्यांच्या तक्रारी येण्याच्या शक्यता आहेत. विभागाने तरतूद वर्गीकरणास अनमुती दिल्यानंतर आर्थिक वर्षामध्ये वर्गीकरण केलेल्या कामांमधील तरतूदी संदर्भात घट केलेल्या कामासाठी तरतूद कमी पडल्यास किंवा त्या कामामधून नविन काम करावयाचे होते अशा प्रकारच्या इतर बाबी उध्दभवल्यास सर्व जबाबदारी ही संबंधीत विभागाची आहे.

सबब, मा.स्थायी समिती / मा.महापालिका सभेने सदस्य पारीत ठरावास मंजूरी दिल्यास संबंधीत विभागाने सदर सदस्य पारीत ठरावांची तपासणी करून विभागाची अनुमती असल्यास सदस्य पारीत ठरावावर कार्यवाही करणेचे अधिकार आयुक्त यांचे असल्याने आयुक्त यांची मान्यता घेऊन तदनंतर वर्गीकरण करणेकामी प्रस्ताव आयुक्तांच्या मान्यतेसाठी लेखा विभागाकडे पाठविणेत यावेत.

13/07/21

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रति :-
सर्व संबंधीत विभागप्रमुख